**MHTH170020752022**

**नियमित दिवाणी दावा क्र.७९/२०२२**
**उषा तिवारी व इतर वि. ललीता शुक्ला व इतर**
**निशाणी क्र.५ वर आदेश**
(दिनांक २१/०१/२०२५)

---

वादींनी प्रतिवादींविरुध्द हा अर्ज अंतरिम मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादींनी दावा मिळकतीवर त्रयस्थ इसमांचा हक्क हीतसंबंध निर्माण करु नये असा अंतरीम मनाई आदेश मिळावा यासाठी दाखल केला आहे.

**०२.** वादी व प्रतिवादींची वडीलोपार्जित मौजे पालघर व माहिम येथे खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

| अ.क्र. | गाव | नगर भुमापन क्र. | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | पालघर | ९५३ | १५९/१/२/अ | ०-०९-० | ०-२८ |

(यानंतर **वाद मिळकत क्र.१** असा उल्लेख) याबाबत या दाव्यात वाद आहे.

| अ.क्र. | गाव | नगर भुमापन क्र. | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | माहिम | ४३० | २ | ०-१२-१ | ०-४९ |
| २. | माहिम | ४३० | ३ | ०-१६-३ | ०-४९ |
| ३. | माहिम | ४६२ | ३ | ०-०३-० | ०-१८ |
| ४. | माहिम | ४६७ | ३ | ०-६०-२ | ०५-०६ |
| ५. | माहिम | ४६८ | ३ | २-३५-७ | १९-४४ |
| ६. | माहिम | ४६९ | २ | ०-१६-२ | ०-५८ |
| ७. | माहिम | ४६९ | ३ | ०-०४-० | ०-१४ |
| ८. | माहिम | ४७० | १ | ०-१८-२ | ०-६२ |
| ९. | माहिम | ४७५ | १७ | ०-००-८ | ०-०८ |
| १०. | माहिम | ४७६ | २ | ०-१२-१ | ०१-३१ |
| ११. | माहिम | ४७६ | ३ | ०-१७-२ | २-०६ |
| १२. | माहिम | ४७६ | ९ | ०-२९-३ | २-१९ |
| १३. | माहिम | ४७६ | १० | ०-१८-० | २-२३ |
| १४. | माहिम | ४७६ | १३ | ०-०८-१ | ०-९७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १५. | माहिम | ४७६ | १५ | ०-११-१ | ०-२८ |
| १६. | माहिम | ४७६ | १६ | ०-०३-० | ०-०९ |
| १७. | माहिम | ४७६ | १८ | ०-०६-१ | ०-८१ |
| १८. | माहिम | ४७६ | १९ | ०-०९-१ | १-०६ |
| १९. | माहिम | ९०७ | २ | ०-७६-० | २-०० |
| २०. | माहिम | ९०७ | २ | ०-२८-० | ०-७५ |

(यानंतर **वाद मिळकत क्र.२** असा उल्लेख) याबाबत या दाव्यात वाद आहे.

**०३.** वादी व प्रतिवादींच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. त्यांनी आपल्या कथनाप्रमाणे (म्हणजेच वादींतर्फे दावा निशाणी क्र.१ मधील व निशाणी क्र.५ मधील कथनाप्रमाणे, प्रतिवादींतर्फे निशाणी क्र.१५ मधील लेखी कैफियतीप्रमाणे) आणि पटलावरील कागदपत्रांप्रमाणे युक्तीवाद केला.

**०४.** पटलावरील उपलब्ध कथनावरुन माझ्यासमोर पुढील मुद्दे उपस्थित झाले व त्यावरील निष्कर्ष मी खालील प्रमाणे कारणमिमांसेसह नोंदवत आहे.

| | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादींनी त्यांची केस प्रथमदर्शनी सिध्द केली आहे काय ? | नाही |
| २. | न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे काय ? | नाही |
| ३. | अर्ज नामंजूर केल्यास वादींचे अपरिमीत नुकसान होईल काय ? | नाही |
| ४. | आदेश काय ? | –अंतीम आदेशा प्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

**०५.** वादींनी आपल्या कथनाच्या पुष्टयर्थ पटलावर दस्त ऐवज यादी निशाणी क्र.३ आणि २५ वर कागदपत्र दाखल केलेली आहेत. तर प्रतिवादींनी आपल्या कथनाच्या पुष्टयर्थ पटलावर दस्त ऐवज यादी निशाणी क्र.२३ वर कागदपत्र दाखल केलेली आहेत.

**<u>मुद्दा क्र.०१ ते ०४ करीता</u> :–**

**०६.** वरील तिन्ही मुद्दे एकमेकांशी संबंधीत असल्याने त्यांचा एकत्रीतरित्या विचार करण्यात येतो.

**०७.** वादींचे असे कथन आहे की, वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे नातेवाईक असून मयत शंभुदयाल अहरावादीन शुक्ला यांचे वारस आहेत. वादी क्र.२ ते ४ हया सख्ख्या बहिणी असून वादी क्र.५ ही त्यांची मयत बहिण मनोरमा हीची मुलगी आहे. प्रतिवादी क्र.१ व २ हे मयत रजनिकांत शंभुदयाल शुक्ला यांचे वारस आहेत. प्रतिवादी क. ३ ते ६ हे वादी क्र.२ ते ४ याचा सख्खा भाऊ मयत विरेंद्र शंभुदयाल शुक्ला याचे वारस आहेत. प्रतिवादी क्र.६ ही मयत रजनिकांत शंभुदयाल शुक्ला याची मुलगी आहे.

**०८.** वादीचे पूढे असेही कथन आहे की,भुमापन क्र.९५३ च्या जमिनीवर असलेली नगरपरिषद पालघर मालमत्ता क्र.८०७ क्षेत्र २४०० चौ.फुट व मालमत्ता क्र.८०७

दावा विषय असून मालमत्ता क.८०७ या २४०० चौ.फुटमध्ये वादींना हिस्सा नको.

**०९.** वादीचे पूढे असेही कथन आहे की, वादी व प्रतिवादी हे मयत शंभुदयाल अहरादिन याचे वारस आहेत. वाद मिळकत क्र.१ ही मयत निर्मला शंभुदयाल शुक्ला हीच्या कब्जेवहिवाटीत होती व दिनांक १८/०३/१९९४ रोजी फेरफार क्र.३४९९ अन्वये तिच्या नावे नोंदवण्यात आली. दिनांक १५/०५/२०१३ रोजी निर्मला शुल्का हीचे निधनानंतर वारसांची नावे ७/१२ सदरी लागली व तसा फेरफार क्र.५८२० महसुल दप्तरी नोंदवण्यात आला.

**१०.** वादीचे पूढे असेही कथन आहे की, वाद मिळकत क्र.२ मधील स.क्र.९०७/१, ९०७/२, ४६२/३, ४६२/२ ची जमीन मयत शंभुदयाल अहरादिन शुक्ला याचे नावे झाली व फेरफार क्र.८५८६ महसुल दप्तरी नोंदविण्यात आला. तसेच स.क्र. ४७६/१७, ४७६/३, ४७६/९, ४७६/१०, ४७६/१३, ४७६/१९, ४७६/१६, १७६/१८ या जमिनी वसंत विठ्ठल बाबरेकर यांच्याकडून कुळ म्हणून अप्पर तहसिलदार पालघर शेतजमिन यांचेमार्फत खरेदी केली व त्याचा फेरफार क्र.२२५३२ नोंदवण्यात आला. दिनांक ०९/०१/१९९४ रोजी शंभुदयाल अहरावादीन शुक्ला याचे निधन झाल्यावर त्याच्या वारसांची नावे ७/१२ सदरी दाखल झाली व तसा फेरफार क्र.२९३५० महसुल दप्तरी नोंदवण्यात आला.

**११.** वादीचे पूढे असेही कथन आहे की, प्रतिवादी क्र.२ चे पती व ३ ते ५ चे वडील मयत विरेंद्र शुक्ला याने दिनांक ०३/०६/२०१५ रोजी बाईसरचे पालघर–२ या दस्त नोंदणी कचेरीत घेवून गेला. त्यांनी वादींना म्हटले की, 'टेंम्परारी हमारे फेवर मे पावर रजिस्टर करके दो, ताकी तुम्हे ससुराल से पालघर मे बारबार जमिन जायदाद के कामधाम के बारे मे आना न पडे' असे सांगुन तेथे त्यास कोणताही दस्त वाचायला न देता विरेंद्र शुक्ला व प्रतिवादी क्र.१ यांनी वादींच्या सह्या घेतल्या व दुय्यम निबंधक पालघर–२ याच्या संगनमताने साक्षिदारांच्या सह्या न घेता दस्त क्र.पलर–२/२२७४/२०१५ नोंदवून घेतला.

**१२.** वादीचे पूढे असेही कथन आहे की, दिनांक ०७/०१/२०२१ रोजी दै. लोकमत या वृत्तपत्रामध्ये पालघर गट क्र.४७४/५/१७ पै व ४७६/३ पै या मिळकती असल्याचे निदर्शनास आले परंतु त्यातील जमीन मालक व हितसंबंधीतांची नावे मध्ये वादीचे नाव नसून केवळ विरेंद्र शंभुदयाल शुक्ला व भाचा संजीत रजनीकांत शुक्ला यांचीच नावाची नोंद दिसून आली. त्यांनी कागदपत्रांची पडताळणी केली असता हक्कसोड पत्र नोंदविल्याचे त्यांना कळाले. परंतु सदर हक्कसोडपत्रामध्ये सर्व पानांवर वादींच्या सह्या नाहीत. त्यामुळे सदर दस्ताचे लिखाण हे प्रतिवादी क्र.२ चे पती विरेंद्र शुक्ला व प्रतिवादी क्र.१ यांनी पॉवर ऑफ ॲटॉर्नी ऐवजी समाविष्ट करुन व सदर हक्कसोडपत्र खोटया आशयाचे केले.

**१३.** वादीचे पूढे असेही कथन आहे की, वादींनी वकिल श्री. टी.वाय.अधिकारी यांच्यामार्फत प्रतिवादींना नोटीस पाठवली. प्रतिवादींनी वकिल श्री. एच.व्ही.तरडे यांच्या मार्फत दि. ०४/०३/२०२१ रोजी चुकीचे उत्तर दिले. त्यावेळेस त्यांना या दोन हक्क सोड पत्राबाबत कळाले. त्यामुळे सदर हक्कसोडपत्र रद्द करण्याची त्यांना आवश्यकता आहे. तसेच वादी हे दावा मिळकतीचे लगतदार आहेत. प्रतिवादींनी दावा मिळकतींवर प्लॉटींग केले असून दावा मिळकत विकण्याच्या तयारीत आहेत. दावा प्रलंबित असताना प्रतिवादींनी वाद

मिळकत विकल्यास वादींचे पैशाच्या स्वरुपात न भरुन येणारे नुकसान होईल व क्लीष्टता निर्माण होईल. त्यामुळे दाव्याच्या निकाल लागेपर्यंत दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ इसमांचा हक्क हितसंबंध तयार करु नये असा अंतरीम मनाई हुकूम प्रतिवादींच्या विरुध्द होण्याची विनंती वादींनी केलेली आहे.

**१४.** प्रतिवादींनी हजर होवून दाव्यास लेखी कैफियत व म्हणणे निशाणी क्र.१५ दाखल केले. त्यांनी वादी व प्रतिवादी हे मयत शंभूदयाळ शुक्ला यांचे वारस असल्याची बाब मान्य केली असून वादींचे इरत कथन नाकारले. प्रतिवादींचे कथन असे आहे की, दिनांक ०३/०६/२०१५ रोजीची नोंदणीकृत करण्यात आलेले दोन हक्कसोडपत्र अ.क्र.२२७४/२०१४ व २२७५/२०१४ बाबत वादींना माहिती असतानाही वादींनी प्रस्तुत दावा मुदतीत दाखल केला नाही.

**१५.** प्रतिवादींचे पुढे असेही कथन आहे की, वादींनी दावा मिळकत क्र.१ ही जमीन निर्मला शंभुदयाळ शुक्ला यांनी केलेल्या अर्जानुसार दिनांक १८/०३/१९९४ रोजीच्या तालुका हुकूमाने त्यांचे नावे केल्याचे कथन केले आहे त्यावरुन सदर दावा मिळकत क्र.१ ही वडिलोपार्जित नसून त्यावरील घर क्र.८०७ या मिळकतीवर वादींचा कोणताही हक्क नाही.

**१६.** प्रतिवादींचे पुढे असेही कथन आहे की, नोंदणीकृत हक्कसोडपत्र अनु.क्र.२२७४/२०१५ व अ.क्र.२२७५/२०१५ हे सर्व कायदेशीर तरतुदींची पुर्तता करुनच नोंदविण्यात आले असून त्यावर साक्षीदारांच्या सह्या आहेत. सदर हक्कसोडपत्र अ.क्र.२२७४/२०१५ मधील पान क्र.३ ते ७ या पानांवर वादींच्या सह्या नसल्यातरी पान क्र.८ व ९ वरील वादींच्या सह्या व अंगठे त्यांनी नाकारले नाही तसेच अ.क्र.२२७५/२०१५ मधील पान क्र.३ ते ६ यावर वादींच्या सह्या नसल्यातरी पान क्र.७ व ९ वर असलेल्या सह्या व अंगठे वादींनी नाकारलेले नाहीत.

**१७.** प्रतिवादींचे पुढे असेही कथन आहे की, हक्कसोडपत्र अ.क्र.२२७४/२०१५ हे पालघर येथील दावा मिळकत क्र.१ बाबत व अ.क्र.२२७५/२०१५ हे माहिम येथील दावा मिळकत क्र.२ बाबत करण्यात आले असून दोन्ही दस्त एकाच दिवशी नोंदवण्यात आले व त्यावर वादींच्या सह्या व अंगठे आहेत. त्यामुळे सदर दस्तांना आव्हान देण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार वादींना नाही.

**१८.** प्रतिवादींचे पुढे असेही कथन आहे की, वर नमूद दोन्ही हक्कसोडपत्रांच्या आधारे महसूल दफ्तरी फेरफार क्र.३०२१७ अन्वये वादींची नावे दावा मिळकत क्र.२ मधील जमिनींच्या ७/१२ उता–यावरुन कमी करुण्यात आलेली आहेत. सदर फेरफाराच्या नोटीसा वादींना तलाठी कार्यालयातून पाठविण्यात आल्या होत्या व त्यांना प्राप्त झाल्या होत्या. दोन्ही हक्कसोडपत्र नोंदविल्यानंतरही वादी व प्रतिवादींचे संबंध चांगले होते परंतु दावा मिळकतीपैकी काही क्षेत्र हे संपादीत होत असून त्याचा येणारा मोबदला हा केवळ प्रतिवादींना मिळेल याचा राग मनात धरुन केवळ प्रतिवादींकडून पैसे उकळण्याकरीता वादींनी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.२ व मयत विरेंद्र शुक्ला यांच्या लाभात नोंदवून दिलेल्या हक्कसोडपत्राची पूर्ण माहिती वादींना असूनही त्यांनी जाणुनबुजून प्रस्तुत दावा दाखल केलेला आहे.

**१९.** प्रतिवादींचे पुढे असेही कथन आहे की, दावा मिळकत क्र.१ वर असलेल्या घर मालमत्ता क्र.८०७ या २४०० चौ.फुट घरामध्ये वादींना हिस्सा नको अशी वादींचे कथन आहे. सबब सदरचे घर वगळून दावा मिळकत क्र.१ च्या मिळकतीमध्ये वादी हिस्सा मागत आहेत. परंतु सदरचे घर हे दावा मिळकत क्र.१ वर उभे असल्याने ते सदर जमीन मिळकतीचा भाग आहे. तसेच हक्कसोडपत्र अ.क्र.२२७४/२०१५ चा दस्त पाहता ज्या मिळकतीवरील हक्क वादींनी सोडला त्यामध्ये न.भु.क्र.९५३ ची जमीन म्हणजेच दावा मिळकत क्र.१ व त्यावरील मालमत्ता क्र.८०७ व ८०८ अशी घरे यांचा समावेश आहे. सबब घरे व त्याखालील जमीन या दोन्हीमधील वादींचा हक्क त्यांनी नोंदणीकृत हक्कसोडपत्राने सोडलेला असल्याने सदर एकंदर दावा मिळकतीमध्ये वादींचा कोणताही हक्क राहीलेला नसून वादींना दावा मिळकत क्र.१ मध्ये हिस्सा मागण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही.

**२०.** प्रतिवादींचे पुढे असेही कथन आहे की, वादींचा मनाई हुकूमाचा अर्ज मंजूर झाल्यास प्रस्तुत प्रतिवादींचे मोठे नुकसान होणार असून त्यांना दावा मिळकतींचा उपभोग घेणे शक्य होणार नाही. वादींना कोणतीही प्रथम दर्शनी केस नसून वादीच्या विनंत्या पूर्णपणे चुकीच्या व बेकायदेशीर आहेत. त्यामुळे वादीचा मनाई हुकूमाचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती त्यांनी केली.

**२१.** दोन्ही बाजूंचे तोंडी ऐकले. पटलावरील दोन्ही बाजूंच्या कथनांचे व उपलब्ध कागदोपत्री पूराव्याचे अवलोकन केले.

**२२.** वादींच्या दावा निशाणी क्र.०१ चे अवलोकन केले. असे दिसते की, दिनांक ०३/०६/२०१५ रोजीचे दोन हक्कसोडपत्र म्हणजेच अ.क्र.२२७४/२०१५ व २२७५/२०१५ रद्द करुन मागण्यासाठी, वाटणीसाठी व इतर मागण्यांसाठी वादींनी दावा दाखल केलेला आहे. मान्यता वाद मिळकत क्र.१ मध्ये वादीने एक मिळकत दाखवलेली आहे व वाद मिळकत क्र.२ मध्ये वादींनी एकूण २० मिळकती दाखवलेल्या आहेत. पण यातील भूमापन क्र.९५३ वरील क्षेत्र २४०० चौ.फुट व मालमत्ता क्र.८६० हे सोडले तर बाकी मिळकत वादाची आहे असेही वादींचे कथन आहे.

**२३.** वादी व प्रतिवादी नातेवाईक आहेत, वाद मिळकती वडिलोपार्जित आहेत, अगोदर त्या मयत शंभुदयाल अहरादीन शुक्ला व मयत निर्मला शंभुदयाल शुक्ला यांच्या होत्या व वारसाने त्या वादी व प्रतिवादींकडे आल्या या सर्व बाबी वादातील नाहीत. त्यामुळे या मिळकती संदर्भात वादींतर्फे पटलावर दाखल करण्यात आलेल्या यादी निशाणी क्र.३ वरील दस्त क्र.३ ते २५ ज्यामध्ये ७/१२ उतारे व फेरफारच्या नकला आहेत या बाबत मी जास्त उहापोह करत नाही.

**२४.** दोन्ही वाद मिळकतीमध्ये आपला वारसाने हिस्सा आहे असे वादींचे कथन आहे. तर वादींनी सन २०१५ मध्ये सदर दोन हक्कसोडपत्र नोंदणीकृत करुन दिले व आपला हिस्सा प्रतिवादींना दिला म्हणून आता वादींचा दोन्ही वाद मिळकतींमध्ये कोणताही हिस्सा नाही असे प्रतिवादींचे कथन आहे. म्हणजेच प्रकरणात यादी निशाणी क्र.३ वर दस्त क्र.१ व २ म्हणून दाखल करण्यात आलेल्या सदर हक्कसोडपत्राबाबत या प्रकरणात वाद आहे. हा अर्ज दाखल करुन वादींनी विनंती केली की, दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये कोणाचाही हक्कहितसंबंध निर्माण करु नये असा अंतरीम मनाई हुकूम मिळावा.

मान्यता सदरची बाब प्रतिवादींनी नाकारली.

**२५.** यादी निशाणी क्र.३ वरील दस्त क्र.१ व २ म्हणजेच सदरच्या दोन हक्कसोडपत्राच्या प्रमाणीत प्रतिंचे बारकाईने अवलोकन केले. असे दिसते की, दोन्ही हक्कसोडपत्र एकाच दिवशी म्हणजेच दिनांक ०३/०६/२०१५ रोजी करण्यात आले व नोंदणीकृत करण्यात आले. तसेच असेही दिसते की, कोणताही मोबदला न घेता नैसर्गिक प्रेमापोटी वादींनी प्रतिवादींच्या हिश्यामध्ये वाद जमिनीतील आपला हक्क सोडून दिला व त्यासाठी हे हक्कसोडपत्र करण्यात आले व नोंदणी करण्यात आले. मान्यता नोंदणीकृत दस्तऐवजाला कायदेशीर गृहीतक असते.

**२६.** या नोंदणीकृत हक्कसोडपत्राबाबत वादींचे दाव्यात असे कथन आहे की, वादी हे दुर गावी राहतात म्हणून मालमत्तेची देखभाल करण्यासाठी कुलमुखत्यारपत्र करुन घेत आहेत असे सांगून प्रतिवादी क्र.१ व प्रतिवादी क्र.२ चे पती मयत विरेंद्र शुक्ला यांनी कुलमुखत्यार ऐवजी हक्कसोड दस्ताचे लिखाण केले व सामील केले व त्यांच्या सह्या घेतल्या. वादींचे पुढे असेही कथन आहे की, भाऊ आहे असा विश्वास ठेवून त्यांनी न वाचता किंवा कागदपत्रांची पडताळणी न करता त्यावर दुय्यम निबंधक कार्यालयात सह्या केल्या. वादींचे पुढे असेही कथन आहे की, त्या दोघांनी त्यांना फसवूण बोगस व खोटया आशयाचे दस्त पूर्णत्वास नेले. म्हणजेच आपल्याला फसवूण ते दोन्ही दस्त करण्यात आले असे वादींना या क्षणी म्हणावयाचे दिसते. कारण वादींनी हे दस्त याच कारणावर रद्द करावेत अशी विनंती केली. मान्यता सदरचा दस्त दुय्यम निबंधक कार्यालयात करण्यात आला किंवा तेथे सह्या घेण्यात आल्या व वादी तेथे गेल्या होत्या या बाबी तरी वादींना या क्षणी मान्य असल्याचे प्रथम दर्शनी दिसते. कारण दावा परिच्छेद क्र.५ मध्ये त्यांनी स्पष्टपणे मान्य केले की, दिनांक ३०/०६/२०१५ रोजी बोईसर चे पालघर-२ या दस्त नोंदणी कचेरीत त्यांना नेण्यात आले व दस्त वाचावयास न देता त्यातील मजकुर समजावून न सांगता त्यांच्या सह्या घेण्यात आल्या. मान्यता तेव्हापासून वादींनी त्यावर काही आक्षेप घेतला काय या बद्दल पटलावर या क्षणी कोणताही कागदोपत्री पुरावा नाही.

**२७.** या अनुषंगाने वादींचे दाव्यात पुढे असे कथन आहे की, दिनांक ०७/०१/२०२१ रोजीच्या दै.लोकमत या वृत्तपत्रामध्ये वाद मिळकत गट क्र.४७५/५/१७ पै व ४७६/३ पै या मिळकतींबाबत त्यांना निदर्शनास आले व त्या मिळकती प्रकल्पासाठी संपादीत होणार आहे असे दिसले. त्यांचे पुढे असेही कथन आहे की, त्यावेळेस त्यांना त्यांची नावे दिसली नाहीत म्हणून त्यांनी माहिती घेतली असता त्यांना हक्कसोडपत्राबद्दल कळाले. मान्यता या हक्कसोडपत्राबद्दल वादींना नोंदणीपासून ते जानेवारी २०२१ पर्यंत पूर्णपणे माहिती होते असातरी कोणताही पुरावा या क्षणी प्रतिवादींतर्फे पटलावर दाखल नाही. पण दोन्ही हक्कसोडपत्र नोंदणीकृत आहेत व त्यावर वादींचे फोटो, सह्या आणि अंगठयांच्या निशाणी आहेत, ही बाब लक्षात घेता त्यातील मजकुराला व नोंदणीला कायदेशीर गृहीतक आहे. सदरची बाब कायदेशीर गृहीतकाची असल्यामुळे आज रोजी वादींच्या विरोधात असल्याचे दिसते. मान्यता या क्षणी या दोन्ही दस्तऐवज करताना फसवणूक झाल्याबाबत कोणताही पुरावा पटलावर नाही. महत्वाची बाब अशी आहे की, सन २०१५ मध्ये सह्या झाल्यानंतर मालमत्ते संदर्भात सन २०२१ पर्यंत चारही बहीणींना

काहीही माहिती होत नाही ही बाब या क्षणी पटण्यासारखी नाही. कारण वाद मिळकत क्र.१ व वाद मिळकत क्र.२ या मधील मिळकतींची संख्या लक्षात घेता ही २१ अशी आहे म्हणजेच जास्त आहे आणि ही संख्या नक्कीच मालमत्तेतील आपला हक्क न विसरणारी व त्या संदर्भात होणा-या कागदपत्रां संदर्भात लक्ष ठेवण्यासारखी आहे. पूढे महत्वाची बाब अशी आहे की, या दोन्ही हक्कसोडपत्रावर वादी राखी, उषा आणि अनिता यांच्या सह्या इंग्रजी भाषेतील आहेत. सदरची बाब लक्षात घेता त्या सुशिक्षीत आहेत व त्यांना सही करताना जाण होती एवढे तरी या क्षणी प्रथम दर्शनी म्हणता येते. म्हणून या क्षणी या दोन्ही दस्तऐवजांच्या विरोधात आपली फसवणूक झाल्याबाबत वादींनी काहीही प्रथम दर्शनी दाखवून दिलेले नाही असे म्हटल्यास न्यायाची बाजू सांभाळली जावू शकते. वादींची फसवणूक झाली किंवा नाही, वादींचा वाद मिळकतीत हिस्सा आहे किंवा नाही व वादी वाटणीस पात्र आहेत किंवा नाही हा सर्व भाग संपरिक्षेचा म्हणजेच साक्ष पुराव्याचा आहे.

**२८.** अशाप्रकारे असे म्हणता येते की, वादींची प्रथमदर्शनी केस नाही, अनुकुलतेचा कल त्यांच्या बाजूने नाही व वादींचा अर्ज नामंजूर केल्यास त्यांचे अपिरीमीत नुकसान होणार नाही. कारण प्रतिवादींनी आपली फसवणूक केली, ते दोन्ही हक्कसोडपत्र कायदेशीर नव्हते हे वादींनी साक्ष पुराव्यादरम्यान सिध्द केल्यास नियमाप्रमाणे त्यांना वाटणीचा हक्क मिळेल. तसेच त्यांची दाव्यातील वाटणीची मागणी लक्षात घेता मालमत्ता हस्तांतरण अधिनियमाच्या कलम ५२ अन्वये त्यांच्या हिश्याला संरक्षण राहील. त्यामुळे वादींचा हा अर्ज याक्षणी नामंजूर करावा लागेल. येणे प्रमाणे मी मुद्या क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी काढून मुद्या क्र.४ चा निष्कर्ष म्हणून खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. वादींचा अर्ज निशाणी क्र.५ नामंजूर करण्यात येतो.

२. खर्चाचा मुद्दा मुळ दाव्याच्या अंतीम निकालाच्या वेळेस ठरविण्यात येईल.

SATISH YADAVRAO KADAM
Digitally signed by SATISH YADAVRAO KADAM
Date: 2025.01.22 17:52:30 +0530

**(सतीश या. कदम)**

दिनांक : २१/०१/२०२५ २ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
ठिकाण : पालघर. पालघर.